**P.R.O Office ,Crime Branch ,Pimpri Chinchwad**
**Address:- Office Of The Commissioner Of Police ,**
**Premlok Park Chinchwad,**
**Maharashtra - 411033**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**<u>प्रेसनोट</u>** **दिनांक -३०/०८/२०२२**

## पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे आस्थापनेवर नेमणूकीस असलेले पोलीस अधिकारी यांचा सेवानिवृत्ती निरोप समारंभ कार्यक्रम संपन्न झाले बाबत.

आज दिनांक ३०.०८.२०२२ रोजी पोलीस मुख्यालय निगडी येथे, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय आस्थापनेवरील नेमणूकीस असलेले श्री. नंदकिशोर भोसले पाटील, सहायक पोलीस आयुक्त, देहूरोड विभाग हे नियत वयोमानानुसार दिनांक ३१.०८.२०२२ रोजी पोलीस दलातुन सेवानिवृत्त होत असलेने त्यांचा सेवापुर्ती सोहळा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

श्री. नंदकिशोर भोसले पाटील, सहायक पोलीस आयुक्त, देहूरोड विभाग यांनी पोलीस दलात एकुण ३५ वर्षे सेवा दिलेली असून त्यांनी कोल्हापुर, सातारा, पुणे शहर, ठाणे ग्रामीण, एस.आयडी.पुणे, लोहमार्ग इ. ठिकाणी आपले कर्तव्य बजाविले आहे. त्यांना एकुण सेवा कालावधीमध्ये उत्कृष्ठ कामगिरी केल्याबद्दल ३०० हून अधिक बक्षिसे व प्रशस्तिपत्र देण्यात आलेली आहेत.

यावेळी कार्यक्रम प्रसंगी बोलताना मा. श्री. अंकुश शिंदे पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड यांनी पोलीस दलात कर्तव्य बजावणे ही एक अभिमानाचीच बाब आहे. समाजासाठी आपण दिलेले योगदान नक्कीच कौतुकास्पद आहे. सेवानिवृत्तीनंतरही आपले हातुन अशीच जनसेवा घडावी असे बोलुन सत्कारमुर्ती पोलीस अधिकारी श्री. नंदकिशोर भोसले पाटील यांना पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या वतीने सन्मानचिन्ह व भेटवस्तु देवून पुढील वाटचालीस व भावी आयुष्यास शुभेच्छा दिल्या.

सदर कार्यक्रमात सत्कारमुर्ती श्री. नंदकिशोर भोसले पाटील यांनी त्यांचे सेवाकालावधीमध्ये त्यांना आलेले वेगवेगळे अनुभव सांगुन पोलीस दलामध्ये राहुन जनतेची सेवा करण्याची संधी मिळाल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

सदर कार्यक्रम प्रसंगी मा. पोलीस आयुक्त श्री. अंकुश शिंदे यांचेसह श्री. डॉ. काकासाहेब डोळे पोलीस उप-आयुक्त मुख्यालय, श्री. मंचक इप्पर, पोलीस उप-आयुक्त परिमंडळ-१, श्री. आनंद भोईटे, पोलीस उप-आयुक्त परिमंडळ-२, श्री. प्रशांत अमृतकर, सहायक पोलीस आयुक्त गुन्हे, श्री. डॉ. सागर कवडे सहायक पोलीस आयुक्त, पिंपरी विभाग, श्री. अनिल दबडे, सहायक पोलीस आयुक्त विशेष शाखा, श्री. श्रीकांत दिसले सहायक पोलीस आयुक्त वाकड विभाग, श्री. रावसाहेब जाधव वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क अधिकारी यांचेसह पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयातील सर्व प्रभारी अधिकारी व अंमलदार यांनी सत्कारमुर्ती यांना पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

**(रावसाहेब जाधव )**
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा,
जनसंपर्क अधिकारी पिंपरी चिंचवड